# निष्कर्ष

## ✻ निष्कर्ष ✻

भारत व पाक यांच्या राष्ट्रप्रमुखांची आग्रा येथील शिखर परिषद गाज्यावाज्याने भरपूर गाजली आहे. दोन्ही राष्ट्रांतील नागरिकांना मानसिक समाधान देणारे काहीच त्या शिखर परिषदेतून निष्पन्न झाले नाही. उंचावलेली अपेक्षा निराशेत परावर्तित झाली असे संशोधनांती दिसून येते. गेली ५४ वर्षे दोन्ही राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या व परराष्ट्रसचिवांच्या ज्या अनेकवेळा बैठका झाल्या होत्या, त्यासारखीच ही शिखर परिषद निष्फळ झाल्याचा लोकांचा समज झाला आहे. त्यामुळे ही शिखर परिषद यशस्वी कि अयशस्वी याबद्दलचे कवित्व परिषद संपल्यानंतर बराच काळ गाजत राहिली, यात शंकाच नाही.

आग्रा शिखर परिषद यशस्वी झाली असे तर म्हणता येत नाही, पण अयशस्वी झाली असेही म्हणता येत नाही, असा काहीसा प्रकार झाला. शिखर परिषद यशस्वी झाली नाही कारण प्रचंड गाजावाजा करुन भरवलेली ही शिखर परिषद दृश्य- परिणामस्वरुपी करार किंवा संयुक्त घोषणापत्र लोकांच्यासमोर ठेवण्यात अयशस्वी ठरली आहे. असा काही ऐतिहासिक कराराचा मसुदा जनतेसमोर ठेवावयाचे हे दोन्ही राष्ट्रप्रमुखांच्या मनात (धोरणात) होते, तसा प्रयत्नही झाला होता असे संशोधनांती दिसून आले. एकदा-दोनदा नव्हे, तर दोन दिवसांत पाच वेळा बैठका झाल्या होत्या. परंतु मसुद्यांतील नेमक्या शब्दांच्या निवडीबद्दलच्या पक्षविपक्षातील मतभेदाने उचल खाल्यामुळे प्रयत्न शेवटी सोडून द्यावा लागला आणि आपले जमत नाही, या एकाच महत्वाच्या मुद्यावर दोन्ही नेत्यांचे एकमत झाले होते.

आग्रा शिखर परिषद अयशस्वी, निष्फळ झाली म्हणावे तर गेल्या ५४ वर्षांचा राजकिय गुंता एखाद्या शिखर परिषदेत सोडविण्याची अपेक्षा कोणी केली नव्हती. मग प्रश्न पडतो तो हा कि या साऱ्या प्रयत्नाला काही ऐतिहासिक महत्व आहे की नाही ? भारत व पाकच्या प्रवक्त्यांनी ही परिषद अयशस्वी झाल्याचा मुद्दा खोडून काढला आहे. पाकचे राष्ट्राध्यक्ष जनरल मुशर्रफ, ज्यांनी भारतीय पंतप्रधान वाजपेयी यांना सॅल्यूट करण्याऐवजी लाहोरच्या त्यांच्या भेटीत अनुपस्थित राहणे पसंत केले होते. शिवाय त्याचवेळी सुरु झालेल्या युद्धाचे जे शिल्पकार होते.

त्यांनीच पंतप्रधान वाजपेयींकडून आलेल्या भारत-भेटीचे आमंत्रण स्वीकारले आणि त्यांच्याशी मनोमिलन घडवून आणले ही जमेची बाजू नाही का धरता येणार? मग भले त्यांनी राष्ट्राच्या प्रशासकाचा अवतार, त्यातून स्वत:ची सर्वसत्ताधीश म्हणून नेमणूक करुन घेऊन २१ तोफांची सलामी स्वीकारतचं भारतात प्रवेश केलेला होता.

सैनिकी हुकूमशहाशी बोलणी करण्यास तयार नसलेले भारत सरकार, ती करण्यास तयार झाले हे जसे लक्षणीय होते, तसेच वाजपेयींना सॅल्यूट न करणारे जनरल मुशर्रफ भारतात येऊन त्याच पंतप्रधान वाजपेयींशी बोलणी करण्यास तयार झाले, हेही महत्वाचे होते. एवढेच नव्हे तर आपल्याला भारत भेटीचे आमंत्रण देण्याचे धाडस पंतप्रधानांनी केले, म्हणून वाजपेयींच्या मुत्सद्दीपणाबद्दल आदरयुक्त उद्‌गार जनरल मुशर्रफ काढून गेले, हेही नसे थोडके.

भारतात आपण खुल्या मनाने येत आहोत, असा नारा देत भारतात प्रवेश केलेल्या जनरल मुशर्रफ यांनी भारत भेटीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी आपली भूमिका पूर्वीच्या पाकिस्तानी राष्ट्रप्रमुखांसारखीच असल्याचे दाखवून दिले. ते तसे वागतील, यांची कल्पना पंतप्रधान वाजपेयींना होती की नव्हती, हे कळावयास मार्ग नाही. कदाचित ती असेलही. पण शिखर परिषदेच्या विशेषत: तिसऱ्या म्हणजे शेवटच्या दिवशी जनरल मुशर्रफ यांनी आपली भूमिका विविध माध्यमांद्वारे सामान्य भारतीयांना वेगवेगळ्या प्रकारे पटवून दिली होती. भारताची भूमिका मात्र अधिकृतरित्या गोपनीय राहीली. ती सामान्य नागरिकांना समजून यावयास शिखरपरिषदेचा अनपेक्षित शेवट झाल्यानंतर म्हणजे जनरल मुशर्रफ मायदेशी परतल्यानंतर परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगेपर्यंत गुलदस्त्यात राहिली.

आंतरराष्ट्रीय राजनीतीत पाकिस्तानने गोपनीयतेचे अवडंबर माजवले नाही, हे योग्य केले की अयोग्य, हा चर्चेचा प्रश्न नंतरचा आहे. त्यांच्या राजकिय डावपेचाचा तो एक महत्वपूर्ण भाग होता व तो यशस्वी ही ठरला आहे. पाकची भूमिका भारतीयांना समजून देणाऱ्यांनी प्रसारमाध्यमांचा पुरेपूर लाभ उठवला होता. भारताची भूमिका समजावणारे मात्र प्रसारमाध्यमांपासून दूर राहिले. पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री, प्रवक्ते यांची स्पष्टीकरणे पत्रकारांच्या हाती

वेळेवर आली नाहीत. याचा अर्थ असा लावावयाचा का, की परदेशी पाहुण्यांना दुखवण्याची एकही संधी घ्यावयाची नाही, हे भारत सरकारचे धोरण होते ? पाक राष्ट्रप्रमुखांनी प्रसारमाध्यमांचा आत्मविश्वासाने उपयोग करुन घेतला होता. जेष्ठ संपादकांशी पाहुण्यां राष्ट्रप्रमुखांची बातचीत ही वास्तविक गोपनीय ठेवण्याचा संकेत पाळणारी घटना आहे. जे जाहीरपणे बोलता येत नाही, ते आमजनांचे मत बनविणाऱ्या संपादकासमोर मांडण्याचा सार्वत्रिक प्रघात आहे. ही चर्चा बहुतांशी गुप्त ठेवण्याचाही प्रघात आहे. जनरल मुशर्रफ यांनी संपादकांशी बातचीत करण्याच्या निमित्ताने भारत राष्ट्रवासियांना तसेच पाकिस्तान राष्ट्रवासियांना उद्देशून चर्चा केली, प्रश्नोत्तरे केली, हे उघड झाले. भारतसरकार गाफील राहिल्यामुळे असेल किंवा पाहुण्यांचा मुखभंग न करण्याच्या निर्धारामुळे असेल. दूरदर्शनच्या प्रतिनिधीला आमंत्रित न करण्याचे धाडस पाकने दाखविलेच, शिवाय ती संपादकांशी केलेली बातचीत जशीच्या तशी दाखविण्याचे अधिकार एका व्यावसायिक वाहिनीला दिले होते.

भारतसरकारला हात चोळत बसण्यावाचून गत्यंतर राहिले नाही. एकीकडे वाजपेयी-मुशर्रफ या दोन्ही राष्ट्रप्रमुखांची अधिकृत बैठक चालू असताना एका वाहिनीवर संपादकांच्या प्रश्नांना जनरल मुशर्रफ यांनी दिलेली मनमोकळी उत्तरे जगभरातील सर्व नागरिकांना दाखविली जात होती. त्या उत्तरांतूनच ते दोन्ही राष्ट्रवासियांना आपली तर्कनिष्ठ भूमिका पटवून देत राहिले. परिणामी पाकची भूमिका भारताच्या भूमिकेपूर्वीच सामान्यजनांना कळून चुकली, असे म्हणता येईल. त्यांचा मनमोकळेपणा, त्यांची वैचारिक स्पष्टता, सैनिकी जरब ही तर नजरेत भरण्यासारखी होतीच. भारत भेटीवर येताना ते किती तयारी करून आले होते व कोणत्या विचारांनी ते शिखर-परिषदेत सहभागी होणार आहेत, याचे प्रत्यंतरही त्यांनी दाखविले. हा संकेताचा भंग झाला काय, याचा विचार भारत करीत बसला, पण तोपर्यंत जनरल मुशर्रफ यांनी अपेक्षीत परिणाम साधून घेतला होता. त्याच्या तथाकथित संकेतभंगावर उतारा म्हणून भारताकडून तशाच प्रकारची प्रतिक्रिया त्याच दिवशी अपेक्षित होती, तसे काही घडले मात्र नाही. आता जनरल मुशर्रफ यांच्या संकेतभंगाबद्दल तक्रार करीत राहण्याने काय साधणार आहे?

जनरल मुशर्रफ यांनी केवळ अचूक वेळ साधली असे नव्हे, तर आपल्या राष्ट्रवासियांची मते, भारतीयांची मते, आपली भूमिका, भारताची भूमिका यातील मूलभूत फरकही समजावून सांगितला होता. त्यामुळे काश्मीर प्रश्नात पाकलाही विशिष्ट भूमिका आहे, हे भारतीय जनतेच्या ध्यानी आले होते.

काश्मीरचा प्रश्न हा दोन्ही राष्ट्रांच्या संबंधात इतर प्रश्नापेक्षा अधिक महत्वाचा कसा आहे, इतिहास उगाळत बसण्याने याबाबतीत प्रगती कशी होणार नाही, भविष्याकडे नजर लावून भारताने कोणती भूमिका घेणे अगत्याचे आहे, काश्मीर प्रश्न सर्व समस्यांमध्ये केंद्रस्थानी कसा आहे, इतिहासातील घटनांवर सारखे बोट न ठेवता नव्याने सुरुवात का केली पाहिज,. परस्पर विश्वासाने वातावरण निर्माण करण्यासाठी एकेक पाऊल कसे उचलणे अगत्याचे आहे, अशा अनेक प्रश्नांचा ऊहापोह त्यांनी केला. आपल्याला आमंत्रित करून पंतप्रधान वाजपेयींनी पहिली पायरी गाठली आहे. दुसऱ्या पायरीत त्यांनी काश्मीरचा प्रश्न हा दोन्ही राष्ट्रांमधील समस्यांत केंद्रस्थानी असल्याचे मान्य करणे आवश्यक का आहे, तसेच आता नाही, तर निदान भविष्यात काश्मीरी जनतेच्या मतांना किंमत द्यावी लागणार आहे. त्यामुळे काश्मीरी प्रतिनिधींना चर्चेत सहभागी करुन कसे घ्यावे लागणार आहे, यांचे प्रतिपादन करताना जनरल मुशर्रफ प्रभावी संभाषण करीत असल्याचा अनुभव आला. एकदा या दोन पायऱ्या गाठल्या तर काश्मीरी समस्येवरील सर्व शक्य उपायांची जंत्री करुन त्यातील एकेक उपाय शक्याशक्यतेचे निकष लावून संख्येने कमी करत राहणे हा एकमेव पर्याय शिल्लक राहील, असेही त्यांनी सांगितले होते.

काश्मीरप्रश्नी भारताची भूमिका पाकशी वाटाघाटी करताना तेथून काश्मीरमध्ये सुरु असलेल्या अतिरेकी कारवाया थांबवण्या इतपत मर्यादित आहे. अन्यथा काश्मीर हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे पाकने तो सोडविण्यासाठी मदत घेणेसुद्धा भारताला मान्य नाही. त्यात पुन्हा कोणत्याही तिसऱ्या गटाला चर्चेत सहभागी करुन घेण्यास भारत तयार नाही. काश्मीरप्रश्नी पाक व भारत दोन्ही राष्ट्रप्रमुख आपापल्या भूमिकेपासून हटावयास तयार नाहीत, हे ध्यानात आल्यानंतर पुढची चर्चा निष्फळ ठरणार, हे उघडच होते. शब्दच्छल करण्यात वेळ

दवडणे जनरल मुशर्रफ यांना मान्य नाही. भारताची भूमिकाही स्पष्ट असल्याने कोणत्याही परिषदेत शब्दच्छल करत बसण्याशिवाय अन्य पर्याय भारताकडे नाही, अशी ही अवस्था होती. म्हणजेच शिखर परिषदेचा निकाल, ती सुरु होता होताच लागला होता. तरीही पक्ष-विपक्ष मसुद्यावर खूप चर्चा करत राहिले. संपादकांबरोबर केलेल्या प्रदीर्घ बैठकीत जनरल मुशर्रफ काश्मीर पलीकडे गेलेच नाहीत, हे लक्षणिय आहे.

इतर क्षेत्रातील परस्पर-सहकार्याबद्दल त्यांनी एकही शब्द काढला नाही. अण्वस्त्र-स्पर्धा असो किंवा अंमली पदार्थाचा छुपा व्यापार, सांस्कृतिक देवाणघेवाण असो किंवा अन्य काही असो. केवळ युद्धकैद्यांबाबतच्या एका प्रश्नांवर त्यांनी स्पष्ट उत्तर दिले. आपण स्वत: सैनिक असल्यामुळे युद्धकैदी शत्रूराष्ट्रांच्या तुरुंगात खितपत पडणे आपल्याला मान्य नाही. पाकला परत गेल्यानंतर यांची चौकशी करून भारतीय युद्धकैदी पाकमध्ये असल्यांस त्यांना परत पाठवू असे त्यांनी नि:संदिग्ध शब्दांत सांगून टाकले. पाकला परत गेल्यावर पाकिस्तानी तुरुंगातील युद्धकैदी शोधून काढण्याची सूचनाही त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिली होती.

प्रसारमाध्यमांची सवय असलेल्या आपल्या सरकारने जनरल मुशर्रफ यांना प्रसार-माध्यमांचा भरपूर वापर करून दिला. भारताने मात्र गोपनीयतेचा आधार घेतला होता. असे का केले, हेही कळावयास मार्ग नाही. गोपनीयतेची पाठराखण आपल्या भूमिकेच्या मूळावर येत आहे, हे कळूनही तसे वागले. परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह प्रसार-माध्यमांपुढे सहसा पुढे येत नव्हते. किमान प्रतिपक्ष डाव आपल्यावर उलटवत आहे, हे पाहून तरी त्यांनी थोडा अधिक पारदर्शकपणा आणावयास हरकत नव्हता. त्यात पुन्हा प्रवक्ता म्हणून मोठा अनुभव असलेल्या प्रसारणमंत्री सुषमा स्वराज्य यांनी काश्मीर प्रश्नावरील जनरल मुशर्रफ यांचा हळवेपणा लक्षात घेऊन त्यांचा संदर्भ दिवसभराच्या चर्चेवर भाष्य करताना टाळावयास नको होता. श्रीमती सुषमा स्वराज्य यांच्या अर्धवट वक्तव्याला पाककडून आक्षेप घेतला जाईल, याची त्यांना कल्पना आली नव्हती काय? मग दुसरा संपूर्ण दिवस आपण नेमके काय बोललो, यांचे स्पष्टीकरण त्यांना देत बसावे लागले होते. आता परराष्ट्रमंत्र्यांनी श्रीमती सुषमा स्वराज्य यांची कितीही बाजू घेतली तरी ती चूक

सुधारणे शक्य नाही. शक्यता अशी आहे की, वाजपेयींच्या आमंत्रणाचा स्वीकार करतानाच जनरल मुशर्रफ यांनी भारत-भेटीचा वापर कसा करावयाचा यांचा निश्चित रणतंत्र ठरविल्याप्रमाणे केला होता. निश्चित विषयपत्रिका भारताची तयार नव्हती. सारे काही लवचीक ठेवावे, असा आग्रह धरत भारताने मात्र काय करावयाचे ठरविले होते? काश्मीर हाच एक कलमी कार्यक्रम घेऊन ते आले होते. निश्चित विषयपत्रिका नाही, हे ठरल्यानंतर आपले मंत्री, अधिकारी मात्र गाफील राहिले असेच म्हणता येईल.

जनरल मुशर्रफ हे प्रसारमाध्यमातून दोन्ही राष्ट्रांना संदेश देतील. हे सुद्धा ध्यानी न आल्यामुळेच भारत गोपनीयता पाळत राहिला. जनरल मुशर्रफ यांनी सरकारी पाहुण्याला असलेल्या अधिकाराचा बरोबर वापर करत आपला स्वार्थी कार्यभाग साधला. दोन दिवस केवळ पाकिस्तानी भूमिका जनतेसमोर येत राहिली होती. भारताची भूमिका मात्र गोपनीयतेच्या फाईलमध्येच बंद राहिली होती, असे होण्याने भारतीय बाजू लंगडी दिसली. परवेज मुशर्रफ बाजी मारून गेले. परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी जनरल परवेज मुशर्रफ पाकिस्तानात परतल्यानंतर पत्रकारपरिषदेत भारताची बाजू मांडली, त्यावेळी मात्र अत्यंत प्रभावीपणे ती बाजू मांडली होती. हे नाकारता येत नाही. पण वेळ टळून गेली होती. अचूक वेळ जनरल मुशर्रफ यांनी साधली होती. भारत त्याही बाबतीत मागे पडला होता.

परराष्ट्र धोरणाबद्दल आज भारताचे नेतृत्व बहुमुखी बनले आहे. पंतप्रधान वाजपेयींच्या उदारमतवादी धोरणास गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांचा संपूर्ण पाठिंबा आहे, असे दिसून येत नाही. अडवाणी हे भाजपातील प्रमुख राष्ट्रवादी भूमिकेचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांच्याशी अडवाणी यांचे वैचारिक मतभेद, अशा अवस्थेत पाकबरोबर करार करताना तिघांनाही मान्य होणारा मसुदा पाहिजे. पाक मंडळी पाच बैठकीनंतर वैतागली होती. कारण या तिघांनाही मान्य होणारा मसुदा तयार होऊ शकला नाही. पाकच्या प्रवक्त्यांनी हे स्पष्ट बोलून दाखविले. अदृश्य हातामुळे करार होऊ शकला नाही. हा अदृश्य हात कोणाचा? अडवाणीचा असेलही कदाचित.

कसेही असले, काहीही असले तरी आपल्या छुप्या पण बहुमुखी मतप्रणालीतील वैगुण्य उघडे पडले. शिवाय पंतप्रधान वाजपेयी, गृहमंत्री अडवाणी, परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह हा समभूज त्रिकोण नाही, म्हणून हा गोंधळ झाला असावा. पंतप्रधान वाजपेयींवर असणारा विहिंप, आर. एस्. एस्. यांचा अप्रत्यक्ष दबाव या सर्व कारणांमुळे आग्रा येथील शिखर-परिषदेतून भरीव अशी काहीही उपलब्धी होणार नाही, अशी अटकळ बाळगणाऱ्यांना अपेक्षेनुसार ती तशी झाली नाही. हे ध्यानात आले, तरीही नकारात्मक उपलब्धी बरीच झाली. भारताची वैगुण्ये तरी भारताला कळाली. आत्मपरिक्षणाची नवी संधी मिळाली, असे म्हणता येईल. हीच प्रगतीची सुरुवात होऊ शकते.

बुद्धीबळ असो किंवा टेनिस सामन्यात पहिली बाजी कोण मारतो याला फारसा अर्थ नसतो. कारण हे सामने एकमेकांचा अंत पाहण्याइतके संथ होतात. अधिक काळ मैदानात टिकून राहण्याची शक्ती कोणाकडे आहे, यावर बरेच काही अवलंबून असते. मानसिकदृष्ट्या न खचणारा खेळाडू शेवटपर्यंत टिकला तरच सामना जिंकू शकतो. आग्रा येथील शिखर परिषदेमुळे सुरु झालेला सामना बराच काळ चालणार आहे. पाकिस्तानने पहिली खेळी जिंकली आहे. भारताला काळजीचे कारण नाही. प्रयत्न भारताने सुरु केले म्हणजेच आमंत्रण भारताने दिले, बाजी पाकिस्तानने मारली एवढेच या शिखर परिषदेचे फलित आहे. पुढच्या शिखर परिषदेत असे होऊ नये म्हणजे बरे!